**नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,**
**जळगाव शाखा.**

जावक क्र. अभिन्यास / मौ.चोपडा ता.चोपडा / गट नं.११३५/सर्स-जळ/ 9e८२

बी.जे.मार्केट, डी हॉल, जळगांव
जळगाव, दि.२८/७/२०१६

प्रति,
मुख्याधिकारी,
चोपडा नगरपरिषद, चोपडा

विषय :- मौजे.चोपडा शिवारातील ता.चोपडा, जि. जळगांव गट. नं.११३५ (एकूण क्षेत्र ६५००.०० चौमी. पैकी ६३००.०० चौ.मी.) मधील जमिनीवर रहिवास प्रयोजनार्थ भूमी अभिन्यास तात्पुरती (Tentative) मंजूरी मिळणे बाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र.१२५१/ सन २०१६-२०१७ दि.८/७/२०१६

सदर जागा चोपडा (मुळ हद + दुसरी सुधारीत ) मंजूर विकास योजना नुसार रहिवास विभागात आहे.

संदर्भाधिन पत्रासोबत प्राप्त झालेल्या विषयांकित अभिन्यासाची छाननी केली असता ते सर्वसाधारणपणे नियमानुसार दिसून येतात. त्यास खालील अटींवर अभिन्सास तात्पुरती (Tentative) मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे.

अटी/ व शर्ती:-

१ अभिन्यासातील रस्ते, गटारी,जलवाहिन्या, छोटे पूल, मोठे पूल, रस्त्यालगतचे पथदिवे इत्यादी सुविधा मुख्याधिकारी, नगरपरिषद यांचे समाधान होईल असे विकसीत करुन ते नगरपालिकेकडे सुपूर्द करण्याची जबाबदारी जमिनमालक / अभिन्यासधारक यांची राहिल.

२ अ.क्र.१ मधील सुविधा मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी विकसीत करावे अशी जमिन मालकांची इच्छा झाल्यास जमीन मालकांकडून सदर कामाचा अंदाजपत्रकीय खर्च अग्रीम रक्कम म्हणून जमा/ वसूल करणे आवश्यक राहील.

३ विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतुदीनुसार अभिन्यासातील खुल्या जागेबाबत आवश्यक ते प्रतिज्ञापत्र नगरपरिषदेने आपले स्तरावर प्राप्त करणे आवश्यक राहील.

४ ह्या परवानगीशी संबंधित नसलेली जमीन विकसीत करणे जमीन मालकास अभिप्रेत नाही.

५ अर्जदाराने अभिन्यासाची जागेवर मंजूर अभिन्यासाप्रमाणे संबंधित भूमी अभिलेख, विभागाकडून आखणी (Demarcation ) करावी. जागेवर आखणी करतांना आजुबाजुच्या मंजूर अभिन्यासातील रस्ते तसेच विद्यमान रस्ते आणि या अभिन्यासातील रस्ते यांचा जागेवर समन्वय साधावा. तसेच भूखंड क्षेत्रात व जुळवणीत तफावत असल्यास सुधारीत मंजूरी घेणे आवश्यक राहील.

६ जागेवर प्रत्यक्ष आखणीप्रमाणे तयार केलेला अभिन्यास अंतिम मंजूरीसाठी आपल्या कार्यालयामार्फत या कार्यालयास सादर करावा.

७ प्रत्यक्ष जागेवर सिमांकन करतांना अभिन्यासातील सर्व रस्त्यांची रुंदी अभिन्यासात नमूद रस्त्याची रुंदी प्रमाणे जागेवर असणे आवश्यक आहे.

८ सिमांकन करतांना लगत मंजूर अभिन्यासातील पोच रस्त्यांची अभिन्यासातील रस्त्यांशी जुळवणी करुन घेणे आवश्यक राहील.

९ प्रत्यक्ष जागेवर सिमांकन केलेल्या अभिन्यासातील भूखंडांचे क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलीतील अनुज्ञेय क्षेत्राप्रमाणे असणे आवश्यक आहे.

१० खुल्या जागेचे क्षेत्र एकूण रेखांकनातील क्षेत्राच्या १० टक्के इतके किमान राहिले पाहिजे व ती जागा कायम खुली ठेवण्यात आली पाहिजे. खुली जागा म्हणून निर्देश केलेला भूखंड स्थानिक प्राधिकरणाकडे नाममात्र रुपये १/- शुल्कावर व्यवस्थापन करण्याकरीता सुपूर्द करण्यात यावा व तो भूखंड खुली जागा किंवा क्रिडांगण म्हणून उपयोगात आणावा. त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम सक्षम प्राधिकरणाच्या अनुमती शिवाय करता येणार नाही.

११ सदर अभिन्यासातील जमिनीलगत देण्यात आलेली परवानगी ही, परवानगी दिल्यापासुन एक वर्ष कालावधीसाठी वैध राहील. तद्नंतर त्यास नियमानुसार मुदतवाढ घेणे बंधनकारक राहील.

१२ अभिन्यासातील जमीनीलगत महसूल स्तरावर पूर्वी बिनशेती मंजूरी दिलेली असल्यास, त्यातील पोच रस्त्यांशी योग्य तो समन्वय साधणे आवश्यक राहील.